# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

**शैक्षणिक सहल**

प्रभात पुणे
बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०१३

# कर्मवीरांच्या समाधीस्थळास खेडच्या प्राध्यापकांची भेट

■ कडूस, दि. १० (प्रतिनिधी) - राजगुरूनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीस्थळाला भेट देऊन त्यांच्या कार्याला अभिवादन केले.

कर्मवीरांनी सुरू केलेल्या पहिल्या शैक्षणिक संकुलातील यशवंतराव चव्हाण विज्ञान, छत्रपती शिवाजी कला व डॉ. धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयातील अद्ययावत ग्रंथालय, प्रयोगशाळा, वर्गखोल्या, जिमखाना, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा केंद्र अशा विविध विभागांची माहिती प्राचार्य डॉ. अरविंद गोंजारी यांनी करून दिली. तसेच रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयास भेट देऊन कर्मवीर भाऊराव पाटलांनी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीची माहिती संस्थेचे सचिव डॉ. बुरूंगले यांनी दिली. या निमित्ताने जैव विविधतेचा जागतिक वारसा लाभलेल्या कास पठाराची अभ्यासपूर्ण पाहणी सर्व प्राध्यापकांनी केली.

सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य सी. व्ही. खेडकर व सहल विभाग प्रमुख दिलीप मुळूक यांनी केले, अशी माहिती राजगुरू महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय शिंदे यांनी दिली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख